# मेट्रो ३ चाचणीचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ

## देवेंद्र फडणवीसही उपस्थित राहणार



**मुंबई** : कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो ३ या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गाच्या आरे येथील कारशेडमध्ये दाखल झालेल्या प्रोटोटाईप मेट्रो ट्रेनच्या चाचणीचा शुभारंभ राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते मंगळवारी पार पडणार आहे. यावेळेस राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित राहणार आहेत.

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडच्या माध्यमातून कुलाबा-वांद्रे-सिप्झ या ३३.५ किमी भुयारी मार्गाचे काम सध्या वेगाने सुरू आहे. तर दुसरीकडे सत्ताबदल झाल्यानंतर मागील अडीच वर्षांपासून थांबलेले आरे येथील कारशेडचे काम पुन्हा सुरू करण्यास हिरवा कंदील दाखविण्यात आला. ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीलाच ४-४ संचामध्ये आंध्र प्रदेश श्रीसीटी येथून प्रोटोटाईप ट्रेनचे डबे मुंबईतील आरे येथील सारिपूत नगरमध्ये दाखल करण्यात आले.

काही दिवसांपूर्वीच मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी संपूर्ण ८ डब्यांच्या मेट्रोची जोडणी पूर्ण झाल्यानंतर ट्रेन चार्जिंग झाल्यानंतरच चाचणीला सुरुवात करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले होते. त्यानुसारच मंगळवारी प्रोटोटाईप ट्रेनचे चार्जिंग पूर्ण झाले असून चाचणी सुरू करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सकाळी ११ वाजता आरे सारिपूत नगर येथे ट्रेनचे हस्तांतरण व ट्रॅकची चाचणी करण्यात येणार आहे. येत्या काही महिन्यांमध्ये मेट्रो ३ च्या ताफ्यात आणखी मेट्रो डब्यांचा समावेश होणार आहे.